

एक होता गणपत...
गोष्ट एक खुशहाल गावाची...
भाग – १

ही गोष्ट आहे भारतातील एक छोटं गांव जगदीशपुरची इथे खुप अज्ञानता आणि अंधविश्वास असल्यामुळे मागील काही वर्षात प्रगति झाली नाही, पण एक असा दिवस उजाडला जेव्हा त्याच गावातील एका युवकाने वर्षोंवर्ष चाललेली परंपरा तोडून गांवक-यांचे डोळे उघडले.... त्याने न केवळ लोकांच्या मनात अनेक वर्षांपासून असलेली अज्ञानता आणि रूढिवाद संपवला पण त्याच बरोबर गांवक-यांना प्रगतीची अशी वाट दाखविली की काही वर्षातच त्यांचे गांव समृद्ध होईल आणि दुस-या गावांसाठी ते आदर्श असेल.. चला तर माहित करूया की झाले तरी काय ?

◌

तर चला बघुया की गावाचे चित्र कसे बदलले . . .





(गावाचे सरपंच आणि काही लोक आंगणात बसले होते)
(तेव्हा अचानक गांवतील काही लोक सरपंचाकडे येताना दिसले)
सर्व लोक : राम, राम ! सरपंच .... (एकत्र बोलले)
सरपंच : राम, राम ! राम राम !
अरे गणपत तु.. गंगुताई.. रघुकाका.. लक्ष्मीताई.. तुम्ही सर्वजण या या बसा बसा आणि सांगा आज अचानक तुम्ही सर्व एकत्र कसे काय आलात?
गणपत : त्याचं काय आहे, सरपंचजी.. आम्ही ऐकलं आहे की गावात अणु विद्युत केंद्र येणार आहे. हे खरं आहे काय ?


सरपंच : हो, मी पण असं ऐकलं आहे. पण तुम्ही सर्व एवढे चिंतित का आहात? आपल्या गावासाठी ही चांगली गोष्ट आहे.
गंगुताई : हे काय बोलतायं सरपंचजी.. आम्ही तर ऐकलं आहे की त्यातून खूप विकिरण निघतात ज्यामुळे आम्हाला मृत्यु ही येऊ शकतो. अहो मी तर हे पण ऐकलय की त्यामुळे जनावरं व मुलं ही अपंग जन्माला येऊ शकतात. . .
सरपंच : (हसत...) हे काय बोलतेस गंगुताई... जर असं काही असतं तर तिथे काम करणारे सर्व लोक कधीच मेले असते.. अगं असं काही नाही.
पण आपल्याला काही धोका नाही.
(सर्व जण एकमेकांकडे बघतात... )
सरपंच : तुम्हाला सर्वांना माहित आहे का, की ज्या सूर्य देवाताची आपण उपासना करतो त्यातूनही उत्सर्जन बाहेर पडतात ? तुम्ही ज्या घरात राहता त्यातूनही विकिरण बाहेर पडतात एवढंच नाही तर तुम्ही जे खाता... पीता... टी.वी. बघता... रेडिओ ऐकता किंवा आपल्या मोबाइल वर बोलता...
सर्व वस्तुं मधून उत्सर्जन बाहेर पडतात....
(सर्व लोक शांतपणे ऐकतात...)


सरपंच : याला पाहिलतं.. हा कोण आहे ? (सरपंच इशारा करतात...) हा माझा नातू आहे समीर. आजच शहरातून आला आहे... पुढची माहिती हाच तुम्हाला देईल.
(सर्व गावकरी समीरकडे बघतात...)
समीर : सर्व लोकांना माझा नमस्कार...
समीर : काय गंगुताई, ओळखलं का मला ?
(गंगुताई बघून हसते....) गंगुताई : अरे हो, समीर... किती मोठा झालास तू...
समीर : आजोबा बरोबर बोलत आहेत. खरं तर विकिरण एक प्रकारची शक्ति आहे जी निर्सगाच्या प्रत्येक गोष्टीत विद्यमान आहे.... आणि हो जर आपण अणु विद्युत केंद्रातून निघणा-या उत्सर्जनचा प्रश्न आहे तर तो एकदम नगण्य आहे म्हणजे जवळ-जवळ शून्यच आहे.... समजलं का ?



समीर : चला मला आता सांगा तुमच्यापैकी किती लोकांनी आपले एक्स - रे काढले आहेत ?
(तीन चार लोक हात वर करतात )
समी : तुम्हाला माहित आहे का की एकदा एक्स-रे काढल्यावर जेवढा किरणोत्सर्ग तुमच्या शरीरात जातो तेवढा वीस वर्ष अणु विद्युत केंद्रात काम करणे किंवा त्याच्या आजूबाजूला राहण्याइतकां आहे...
सर्व : अच्छा.... (सर्व एकमेकांकडे बघतात....)
लक्ष्मीताई : पण आम्ही तर असं ऐकलयं की अणु विद्युत केंद्रा मध्ये काम करणारे आणि याच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना सर्व प्रकारच्या कर्क रोगांचा धोका असतो.
समीर : लक्ष्मीताई, तुम्ही चुकीचं ऐकलयं. केवळ अणु विद्युत केंद्रामध्ये काम करून किंवा त्याच्या आजूबाजूला राहून कर्क रोग होत नाही जर असं असतं तर अणु विद्युत केंद्रामध्ये कोणी कामचं केलं नसतं.


समीर : आणि हो. मागच्या वर्षात आपल्या गावात तंबाखू खाल्याने तोंडाच्या कर्क रोगांने ४ जणांचा मृत्यु झाला.
अणु विद्युत केंद्रात सुरक्षित उपकरणे आणि कपडे घालून अनेक वर्ष काम करूनही लोकांना काहीच होत नाही.
समीर : याच्या विपरीत क्ष-किरणांचा प्रयोग सीटी स्कॅन आणि एमआरआय करुन कर्क रोगांसारख्या रोगांचे निदान आणि उपचारमध्ये केला जातो. समजलं.
गंगुताई : पण बेटा, काल सविता सांगत होती की अणु विद्युत केंद्राच्या आजूबाजूला राहणाऱ्या बायका विकिरणांमुळे आई बनू शकत नाही. त्या बाळाला जन्म देऊ शकत नाही. हे खरं आहे काय ?
समीर : हसत हसत . . . गंगुताई, सविता काकु एकदम चुकीचं सांगत आहेत. ही सगळी अफवा आहे. पण विकिरणांचा उपयोग करून सोनोग्राफी मशीन द्वारे आपण आपल्या बाळाचा विकास पाहु शकतो. म्हणूनच विकिरण आपला मित्र आहे. शत्रु नाही. समजलं ना काकु? आणि गणपतकाका तुमच्या लक्षात आहे की मागच्या वर्षी संक्रमक सुई मुळे गावात राहणारे रामनरेश यांचा मुलगा शरयु वारला होता.


समीर : सुईला विकिरणच्या मदतीने संक्रमण होण्यापासून वाचवू शकतो आणि सुईला खूप वेळ वापरू ही शकता. यामुळे कोणत्याही व्यक्ती किंवा प्राण्याला नुकसान होत नाही.
गणपत : पण समीर वेटा, आमच्या गावातच का अणु विद्युत केंद्र ? आपण अजून कोणत्या दुसऱ्या पध्दतीने वीज निर्मीती करु शकत नाही का ? कारण आम्ही ऐकलं आहे की अणु विद्युत केंद्रामुळे आमच्या आंब्याच्या बागा, शेती, पीकं आणि मत्स्यपालनावर विपरीत परिणाम होईल.
समीर : चागंला प्रश्न विचारलांत गणपत काका. वीज बनविण्यासाठी खूप पर्याय आहेत पण अणु ऊर्जेतून बनविण्यात आलेली वीज खूप स्वच्छ आणि स्वस्त असते. पर्यावरणावरही काही दुष्परिणाम होत नाहीत. तुमची पीकंही जास्त वेळेसाठी सुरक्षित राहतील. फळांच्या बागा, शेती, आणि मासेही सुरक्षित राहतात.
समीर : कोळसा आणि इतर स्त्रोतांपासून तयार केलेली वीज निर्मीतीमुळे पर्यावरणाला धोका असतो. वायुमंडळात धोकादायक गॅस एकत्रित होतात ज्यामुळे आपल्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम होतो.
याच बरोबर मी हे ही तुम्हाला सांगतो की विकिकरणाचा उपयोग फळांना लवकर सडण्यापासून, कांदा, बटाटयावर लवकर अंकुर फुटण्या पासून वाचविण्यासाठी केला जातो. याच बरोबर डाळ, तांदूळ, वाटाना इ. पीकांना लागणा-या कीटकंपासून वाचविण्यासाठी पण केला जातो जेणेकरून तुमची पीकं जास्त वेळेसाठी सुरक्षित राहतील. फळांच्या बागा, शेती आणि मासे पण सुरक्षित राहतात.
(सर्व जण एकमेकांकडे पाहतात)


समीर : हां अजून एक गोष्ट. इतर स्त्रोतांपासून वीज बनविण्यासाठी साधन कमी आहेत. पण खूप साधनं असल्यामुळे अणु ऊर्जेपासून आपण अनेक वर्षा पर्यंत वीज निर्मिती करु शकतो.
रघुकाका : पण मला एक गोष्ट सांग की आम्ही असं एकलं आहे की सौर ऊर्जा आणि पवन चक्की पासुन सुद्धा ही वीज निर्माण करता येऊ शकते. तर मग अणु ऊर्जेपासूनच वीज का पाहिजे ?
समीर : रघुकाका काका । तुम्ही खुपच चांगला प्रश्न केला आहे. निश्चीत आपण सौर ऊर्जा आणि पवन चक्की पासून वीज निर्माण करु शकतो, पण ह्या दोन्ही स्त्रोतांपासून मोठ्या प्रमाणात ऊर्जा उत्पादन करण्यासाठी आपल्याला भरपूर प्रमाणात जमीनीची आवश्यकता लागेल. दुसरे असं कि सौर ऊर्जेसाठी आपल्याला दिवसा तर सूर्य देव असतीलंच पण रात्री आपण वीज कशी निर्माण करणार ?
(सगळे विचार करताना...)
समीर : आणि जिकडे पवन चक्कीची गोष्ट आहे तर त्यासाठी प्रत्येक वेळी हवेचा चांगला प्रवाह आणि नियंत्रणाची गरज भासते परंतु अणु विद्युत केंद्रसाठी कमी जागेची गरज असते... आणि मोठ्या प्रमाणावर चोवीस तास वीज उत्पन्न करु शकतो, समजलं, ह्यापासून बनणारी वीज ही कमी खर्चिक आणि जास्त फायदेशीर असते.
गंगुताई : पण बेटा, आम्ही तर असं ही एकलं आहे कि अणु ऊर्जा ही खूप धोकादायक असते आणि संकटाच्या वेळी ह्याच्यापासून आपल्याला जीवीत हानी होऊ शकते.
समीर : गंगुताई, तुम्हाला माहीत आहे का की जगामध्ये जर कुठची भयानक गोष्ट असेल तर ती आग. हो, आजपासून आठ लाख वर्षापूर्वी जेव्हा सर्वप्रथम आगीचा आविष्कार झाला होता तेव्हा या ऊर्जे पासून हजारों लोक मरण पावले होते आणि संपत्तीचा नाश झाला होता. पण आज एक लहान मुलगा सुध्दा आपल्या खिशात आगपेटी ठेऊन आरामात फिरत आहे, माहिती आहे का ? कारण आम्ही ह्याला व्यवस्थित - पण कसे वापरात आणायचे ते शिकून घेतले आहे. अशाप्रकारे पूर्णपणे सुरक्षीत आणि सावधानतेने जर कुठचे काम केले तर कुठच्याही प्रकारच्या दुर्घटनेपासून आपण वाचू शकतो ह्याशिवाय खुप वेळा हजारों लोकं रेल्वे आणि विमान अपघांताचे शिकारी होतात, पण मग ते काही रेल्वेने आणि विमानाने प्रवास करायचे बंद करतात का ?




समीर : प्रत्येक वर्षी हजारों लोक पूर, भूकंप, भूस्खलन किंवा सद्याच्या दिवसात होणारे रस्त्यावरील अपघातात आपला जीव गमावतात. म्हणून आपल्या मनातून या सर्व गोष्टी काढून टाका आणि चांगल्या गोष्टींचे स्वागत करा.
गणपत : पण समीर बेटा. अणु विद्युत केंद्रामुळे आम्हांला काय फायदा होणार ? असं ऐकलयं की सरकार तर आमची जमीन देखील घेणार आहे. मग आम्ही काय खाणार... राहणार कुठे ?
समीर : बघा काका. जर सरकारने आपली जमीन घेतली तर त्याच्या बदल्यात आपल्या सर्वांना योग्य मोबदला देईल. आपण सर्वांना पुनर्व्यवस्थित करणे ही सरकारची जबाबदारी आहे. आणि जरा विचार करा की अणु विद्युत केंद्राची निर्मीती झाल्यानंतर गावाचा किती विकास होईल.
School
समीर : आता जिथे आपल्या गावात ५ ते ६ तास वीज येते तीच २४ तास उपलब्ध होईल. आपल्या मुलांसाठी गावातच शाळा असेल, जिथे आपल्या मुलांना मोफत शिक्षण मिळेल. इस्पितळ बनेल जिथे तुम्हाला मोफत उपचाराची सुविधा मिळेल.
समीर : पक्के रस्ते. पाणी. सामुदायिक केंद्र आणि जवळजवळ सगळया लोकांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराची संधी मिळेल.
समीर : तर एकूण काय. तुम्हा सर्वांची प्रगती आणि गाव आनंदी होईल.
(सर्वांचे चेहरे पसन्न झाले)
गणपत : बेटा, हे सर्व ठीक आहे. पण एक गोष्ट मला सांग की हे अणु विद्युत केंद्र किती सुरक्षित आहे ? जेंव्हा भुकंप किंवा सुनामी येईल तेंव्हा काय होईल ? या परिस्थितित आमचे काय होणार ?



हो हो, आमचं काय होणार? . . . (सर्व एकत्र बोलतात)
समीर : शांतता राखा. आपण बरोबर बोलत आहात. आपले प्रश्न बरोबर आहेत. पण मी तुमच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की आपल्या देशातील सर्व अणु विद्युत केंद्रे सुरक्षित आहेत. त्यांचे विभिन्न स्तरांवर परीक्षण करूनच सरकारकडून त्यांच्या निर्मितीची मंजूरी मिळाली आहे.
समीर : ज्या ठिकाणी अणु विद्युत केंद्र उभारावयाचे असते त्या ठिकाणच्या भौगोलकि परिस्थितिचा खूप वर्षापासून आढावा घेतला जातो... जर त्या ठिकाणी भूकंप किंवा सुनामी येण्याची जराही शक्यता असेल तर त्या ठिकाणी सरकार अणु विद्युत उभारणीसाठी संमती देत नाही. आणि हां, जर आपल्याला आठवत असेल तर आपल्या देशातील गुजरात मध्ये भूकंप आणि चेन्नई येथे सुनामी आली होती. या परिस्थितित देखील आपले अणु विद्युत केंद्रे सुरक्षित होती व वीजे निर्मिती व्यवस्थितरित्या सुरु होती.
रघुकाका : पण समीर बेटा आम्हाला अणु विद्युत केंद्राची गरजच काय आहे ? आम्ही सर्व तर ठीक आहोत. आमचं काम तर शेती आणि मत्सयव्यवसाय आहे. आम्हाला तर तेच करायचं आहे मग आम्हाला वीज कशाला हवी ?
गणपत : होय बेटा, आमचे बाप, आजोबा, पणजोबा पण याच व्यवसायात होते आणि त्यांनी आपल्या मुलांना वाढविले . . . आम्हाला याच्यातून काय फायदा होणार आहे ? आमचं तर काम चालूच आहे ना ?
लक्ष्मीताई : हो, हो . . आम्ही तर आमच्या घरात सुखी आहोत, आम्ही चिंता का करू ?
गंगुताई : हो, आम्हाला तर दोन्ही वेळ जेवण मिळते आणि शरीरासाठी कपडे, आम्हाला याच्यापेक्षा अजून जास्त काय हवं ?


समीर : वा गणपतकाका . एकदम बरोबर बोललात. जर सर्व लोकांनी तुमच्या सारखाचं विचार केला तर आजही आपला देश ६० वर्षांपूर्वी जसा होता तसाच राहीला असता. आज स्वातंत्र्याच्या ६० वर्षांनंतर भारताचे नाव जगातल्या काही देशांमध्ये घेतले जाते. जरा विचार करा जर सर्व लोकांनी आपल्या आजोबा, पणजोबांने केलेली शेती आणि मतस्यव्यवसायाचे काम केले असते तर आज आपल्या देशात डॉक्टर, इंजीनियर, शास्त्रज्ञ, खेळाडू किंवा उद्योगपती बनले असते का?
समीर : जर तुम्ही आजारी पडलात तर तुमचा उपचार कोण करेल ? तुमच्या साठी दैनिक गरजांच्या वस्तूं कोण बनवणार ? नवीन नवीन अविष्कार कोण करणार? आज स्वातंत्र्याच्या ६० वर्षांनंतरही आपले विचार बदललेले नाहीत. आज ही तुम्ही अंधविश्वास आणि अज्ञानामध्ये फसलेले आहात.
समीर : गणपतकाका, देशामध्ये विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. ह्यात सर्वात मोठा आधार वीज आहे. जर आपल्या देशात वीज असेल तरच देशाची प्रगती होईल. आपल्या गावात वीज आली तर आपल्या टयुबवेल मधून जास्तीत जास्त शिडकाव करू शकाल. अत्याधुनिक ट्रॅक्टर आणि गुणवत्तावाल्या बीयांच्या मदतीने आपल्या शेतीत १० पट जास्त पीक येईल आणि आपल्या जीवनाचा स्तर सुधारेल.
(सर्व एकमेकांकडे बघतात....)


समीर : गंगुताई फक्त दोन वेळेचं जेवण पुरेस नसतं. तुमची मुलं शाळेत जात नाहीत. त्यांना शिक्षण मिळत नाही. त्यांना पुरेसं पौष्टिक अन्न मिळत नाही. आजारी पडल्यास डॉक्टर नसल्यामुळे त्यांना कुठल्यातरी हकीम बाबाकडे घेऊन जाता व तुमची फसवणूक होते. गावाची प्रगती म्हणजे तुमच्या मुलांची प्रगती. तुमची मुलं शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजीनियर आणि शास्त्रज्ञ बनतील. जरा विचार करा, तुम्हाला किती आनंद होईल? आपले गाव प्रसिद्ध होईल.
समीर : आणि लक्ष्मीताई, छपराच्या घरात तुम्ही आनंदी राहू शकता पण तुमची मुलं नाही. आज पण तुम्ही ६० वर्ष जुन्या गोष्टी करता. आज आपला देश कुठच्या कुठं पोहोचला आहे. भारतात एकापेक्षा एक शास्त्रज्ञ, डॉक्टर, इंजीनियर, खेळाडू आणि उद्योगपती आहेत ज्यांनी भारताचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले आहे आणि तुम्ही लोक आज पण....
समीर : जर त्या लोकांनी तुमच्यासारखाच विचार केला असता तर आज आपल्या देशाचं काय झालं असते ? अरे लांब कशाला जाता मलाच बघा, माझ्या आईवडिलांनी मला शहरात शिक्षणासाठी पाठवले नसते तर कदाचित आज मी ही तुमच्या सारखा अशिक्षित असतो आणि इथे तिथे भटकत असतो.
समीर : आणि हो, अजून एक गोष्ट जर तुम्हाला प्रगती हवी तर सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे वीजेचे उत्पादन. जेवढे जास्त होईल तेवढे व्यवसाय होतील तेव्हाच गाव प्रगती करेल आणि देश आनंदी होईल आता निर्णय तुम्ही घ्यायचा आहे की तुम्ही विज्ञान आणि अंध:विश्वास यामधील काय निवडाल. तुम्ही सर्व एकत्र विचार करा की तुम्हाला काय करायचं आहे?


समीर : आणि लक्ष्मीताई, आणखी एक गोष्ट आपण सगळे इकडे बसून एवढ्या गोष्टी करत आहोत कि अणु ऊर्जा धोकादायक आहे त्याच्यापासून किरणोत्सर्जन होते... आणि अणु विद्युत केंद्रमध्ये काम करणारे आपले इंजीनियर आपल्या परिवारासोबत खूप वर्षापासून राहून देशाच्या प्रगतीत आपले योगदान देत आहेत.
गणपत : समजलं समीर बेटा. आम्ही गेल्या कित्येक वर्षांपासून ज्या सनातनी आणि अज्ञानतेच्या बंधनात होते. त्याच्यातून तू आज आम्हाला बाहेर काढलेस आणि जाणीव करून दिलीस की आज आम्हाला आमचे विचार बदलणे अत्यावश्यक आहे आणि यासाठी आम्ही सर्वजन तयार आहोत.
समीर : आणि हो अजून एक गोष्ट. जर कोणी आपल्या अणु विद्युत केंद्रा विषयी काही उलटसुलट सांगितलं तर त्याच्याकडे अजीबात लक्ष देऊ नका. समजलं ना.
सर्वांना समजलं समीर बेटा... बेटा तु तर आमचे डोळे उघडलेस आणि आमच्या सर्व शंका व गैरसमज खूप चांगल्या पध्दती ने दूर केलेस, आणि आम्हाला जाणीव करुन दिलीस की, आम्हाला सुध्दा देशाच्या प्रगतीमध्ये सहभागी झाले पाहिजे.. आम्ही सगळे तयार आहोत आपल्या गावाला आनंदी बनविण्यासाठी आणि देशाच्या प्रगतीमध्ये सहभागी होण्यासाठी...
समीर : हां, अजून एक गोष्ट. आपल्याला हे ऐकून आश्चर्य होईल पण हे सत्य आहे की अणु विद्युत केंद्राच्या जवळपास स्वच्छ आणि हरित पर्यावरण असल्यामुळे लाखों पक्षी आणि फुलपाखरांनी यांना आपल्या राहण्याचे ठिकाण बनवून ठेवले आहे.




समीरचे वार्तालाप ऐकून गणपत आणि इतर गावकऱ्यांनी अणु विद्युत केंद्राला भेट देण्याचे ठरविले. काय झालं जेव्हा गणपत आणि गावकऱ्यांनी परमाणु वीज केंद्राला भेट दिली ? त्यांनी तिथे कसे वाटले ? त्यांनी तिथे काय पाहिले ?

हे सगळं जाणून घेण्यासाठी वाट पहा पुढच्या अंकाची ?

"अणु ऊर्जा ... देशाची ऊर्जा
स्वच्छ ऊर्जा... स्वच्छ भारत"

**गणपत ची सहल**
गोष्ट परमाणु ऊर्जा केंद्राच्या सहलीची

क्रमशः



एनपीसीआईएल
NPCIL

## न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

द्वारा
लोकहितार्थ प्रसिद्ध


यांच्याद्वारे प्रकाशित केले:

कॉर्पोरेट प्लॅनिंग आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन संचालनालय (सीपी आणि सीसी)

६–एस–१४, विक्रम साराभाई भवन, अणुशक्तीनगर, मुंबई – ४०० ०९४

ई मेल: cpcc@npcil.co.in

वेबसाईट : www.npcil.nic.in